## प्रेस नोट दि. २३/०८/२०२२

## निगडी पोलीस ठाणे, पिंपरी-चिंचवड, गु.रजि.नं. ०६/२०२२, कलम-४२० व इतर या गुन्ह्यात गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड यांनी केलेल्या उल्लेखनिय कामगिरी बाबत

**-:गुन्हयाची हकिगत:-**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालया मार्फत ७२० जागेसाठी पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा दिनांक- १९/११/२०२१ रोजी १५:०० ते १६:३० वाजेच्या दरम्यान विविध सहा जिल्हयातील परिक्षा केंद्रावर घेण्यात आली होती. तसेच त्यातील पात्र उमेदवारांची दिनांक- ११/१२/२०२१ ते २१/१२/२०२१ रोजी पावेतो राज्य राखीव बल गट क्रमांक-१, रामटेकडी, हडपसर, पुणे येथे मैदानी चाचणी परीक्षा घेण्यात आली होती. त्यातील १०७० उमेदवांराना दिनांक- ०३/०१/२०२२ ते ०५/०१/२०२२ पर्यत प्रति दिवस ३८० उमेदवार याप्रमाणे मुळ कागदपत्र पडताळणी करिता निगडी पोलीस मुख्यालय, पिंपरी चिंचवड येथे बोलविण्यात आले होते.

त्यादरम्यान दि. ०४/०१/२०२२ रोजी उमेदवार नामे जिवन त्र्यंबक काकरवाल, वय-२३ वर्षे, रा-मु.पो. रघुनाथपुरवाडी, ता-वैजापुर, जि-औरंगाबाद याचे मुळ कागदपत्र पडताळणी करत असताना त्याचे फॉर्म वरील फोटो आणि स्वाक्षरी यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले. त्याचेकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने मैदानी परिक्षा ही डमी परिक्षार्थी मार्फत दिली असल्याचे व लेखी परिक्षेसाठी इलेक्ट्रॉनीक स्पाय डिव्हाईस वापरुन लेखी परिक्षा दिल्याचे कबुल केले. तसेच अधिक चौकशीमध्ये रविंद्र गुसिंगे व चरणसिंग काकरवाल यांनीदेखील गैरप्रकार केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुद्ध दि. ०४/०१/२०२२ रोजी निगडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-०६/२०२२ भा.दं.वि.कलम-४२० व इतर अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड हे करीत आहेत.

पिंपरी चिंचवड पोलीस शिपाई भरती २०१९ चे मैदानी व लेखी परिक्षेमध्ये गैरप्रकार केले प्रकरणी निगडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-०६/२०२२ भा.दं.वि.कलम-४२० व इतर हा गुन्हा दाखल करण्यात आले असुन त्यामध्ये पुर्वी ५१ आरोपी अटक केले होते त्यापैकी २६ अटक आरोपी हे पिंपरी चिंचवड पोलीस भरती मध्ये उमेदवार होते. तसेच सदर गुन्हयांमध्ये ७५ हुन अधिक आरोपी हे पाहिजे आरोपी म्हणुन निष्पन्न करण्यात आलेले आहेत त्यामध्ये १२ हुन अधिक पाहिजे आरोपी हे पात्र न झालेले उमेदवार होते. त्यामुळे सदरचे पाहिजे आरोपींचा शोध घेणे कामी आम्ही ०३ अधिकारी व १२ पोलीस अंमलदार यांच्या ०४ पथके तयार करुन त्यांना जिल्हा- औरंगाबाद, जालना व बीड याठिकाणे पाठवले होते.

सदर पथकाने आरोपी नामे १)ज्ञानेश्वर सुखलाल चंदेल, वय-२९ वर्षे, रा-मु.पो. लोधेवाडी, पो-खामगाव, ता-बदनापुर, जि-जालना व २) कार्तिक ऊर्फ वाल्मिक सदाशिव जारवाल, वय-२३ वर्षे, रा-मु.पो एकबुर्जी वाघलगाव, ता-गंगापुर, जि-औरंगाबाद यांचा शोध घेतल्याने ते मिळुन आल्याने त्यांना दिनांक- २२/०८/२०२२ रोजी ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. तसेच ३) अरुण विक्रम पवार वय २६ वर्ष रा. मुपो अंथरुण पिंपरी ता व जि-बीड ४) अर्जुन विष्णु देवकाते वय २८ वर्षे रा. मुपो कवडगाव ता वडवणी जि बीड, ५) अमोल संभाजी पारेकर वय २२ वर्षे रा. काळेची वाडी पो. भोगलवाडी ता धारुर जि बीड यांचा शोध घेतल्याने ते मिळुन आल्याने त्यांना दिनांक- २२/०८/२०२२ रोजी ताब्यात घेवुन अटक करण्यात आलेली आहे. अटक आरोपी यांची दि २७/०८/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कोठडीची रिमांड मिळाली आहे.

**निगडी पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ०६/२०२२ मध्ये अटक आरोपींकडुन खालील प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल हँडसेट** | :- | **७६** |
| २ | **इलेक्ट्रॉनिक स्पाय डिव्हाईसेस** | :- | **६६** |
| ३ | **वॉकिटॉकी संच** | :- | **२२** |
| ४ | **वॉकिटॉकी चार्जर** | :- | **११** |
| ५ | **रोख रक्कम** | :- | **११ लाख रूपये** |

याशिवाय १०० हुन जास्त ब्ल्यु-टुथ इयर बग्ज, मोबाईल फोन व स्पाय डिव्हाईसेस लपवुन नेण्यासाठी वापरलेले बनियान, टि-शर्टस्, अंडरवेअर, सपोर्टर, वेगवेगळ्या कंपन्यांचे सिमकार्डस्, कागदपत्रे जप्त करण्यात आलेली आहेत.

नमुद गुन्ह्याचे तपासामध्ये औरंगाबाद, जालना व बीड या जिल्ह्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या व परिक्षांमध्ये गैरप्रकार करणाऱ्या ०६ टोळ्या उध्वस्त केल्या असुन बीड, औरंगाबाद, जालना, नागपुर, अमरावती, अहमदनगर अशा वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे २० हुन अधिक वेळा वेगवेगळ्या तपास पथकांनी आरोपी राहात असणाऱ्या दुर्गम परिसरामध्ये जावून प्रतिकूल परिस्थितीमध्ये आरोपींना अटक केली आहे.

नमुद गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड, सायबर सेल, तांत्रिक विश्लेषण विभाग पिं.चिं. व विशेष पथकाचे पोलीस अधिकारी / पोलीस अंमलदार यांच्या साधिक कामगिरीमधून करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याचा तपास हा मा. पोलीस आयुक्त सो, मा. अपर पोलीस आयुक्त सो, मा. पोलीस उप आयुक्त सो. गुन्हे, यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे देखरेखी खाली ०२ वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ०४ सहायक पोलीस निरीक्षक, ०३ पोलीस उप निरीक्षक तसेच २८ पोलीस अंमलदार यांच्या विशेष पथकाने अहोरात्र तपास करुन गुन्ह्यातील ५१ आरोपींविरुद्ध मा. न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले आहे.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
पोलीस उप-आयुक्त
मुख्यालय/गुन्हे पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner